दिनांक २२/०१/२०२१

**<u>प्रसिध्दी पत्रक</u>**

**आरोपी लोकसेवक राहूल अनंतराव पांचाळ, वय ३२ वर्षे, पद शिपाई, प्रथम वर्ग न्यायालय, औरंगाबाद यांनी १०००/- रु लाचेची मागणी करून स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | राहूल अनंतराव पांचाळ, वय ३२ वर्षे, पद शिपाई, प्रथम वर्ग न्यायालय, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती. रेशमा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या पक्षकाराच्या नावे मा. न्यायालयाने काढलेले जेल वॉरंट कॅश शुआरिटी भरेपर्यंत पुढील कार्यवाही साठी पोलीसांना न देता थांबवून ठेवण्यासाठी मदत केल्याचे बक्षीस म्हणून |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | हॉटेल अदिती, येस बॅक जवळ, अदालत रोड, औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांच्या पक्षकाराच्या नावे मा. न्यायालयाने काढलेले जेल वॉरंट कॅश शुआरिटी भरेपर्यंत पुढील कार्यवाही साठी पोलीसांना न देता थांबवून ठेवण्यासाठी मदत केल्याचे बक्षीस म्हणून तक्रारदार यांच्याकडे श्री. पांचाळ, शिपाई, नेमणुक- प्रथम वर्ग न्यायालय, औरंगाबाद यांनी १०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, राहुल पांचाळ, शिपाई यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रथम १०००/- रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, राहूल अनंतराव पांचाळ, वय ३२ वर्षे, पद शिपाई, नेमणुक- प्रथम वर्ग न्यायालय, औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन १०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार राजेंद्र सिनकर, संदीप आव्हाळे, प्रकाश घुगरे, चालक अंमलदार देविसिंग ठाकूर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :**-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.

